# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 296/2022 दिनांक : 02.08.2022**

## 1)जबरी चोरी :–

**मुखेड** :–दिनांक 01.08.2022 रोजी चे 01.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहाते घरात व राजेंद्र कंद्राळे यांचे घरात मौ. जांब(बु.) ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे घराचे चॅनल गेटचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून वरच्या मजल्यावर झोपलेली फिर्यादीची पत्नी व मुलगी यांना लोखंडी रॉडने मारून जखमी करून पॅटचे खिशातील नगदी 12,500/–रूपये व राजेंद्र विठ्ठल कंद्राळे यांचे घराचे कुलूप तोडुन घरात प्रवेश करून त्यांचे घरातील लहान मुलांचे अंगठया व कानातील सोन्याच्या काडया व सोन्या चांदीचे दागीने असा एकुण 46,900/–रूपयाचा ऐवज जबरीने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी गणपत पि. यादवराव कानगुले, वय 45 वर्षे, व्यवसाय नौकरी बेकरी दुकान व पानटपरी रा. मराठवाडा ग्रामीण बॅकेच्या बाजुला मौ. जांब(बु.) ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 231/2022 कलम 394, 457, 380, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री बोधगीरे, मो.क्रं. 8369695184** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :–

**भाग्यनगर** :– दिनांक 30.07.2022 रोजी 18.00 ते दि. 01.08.2022 चे 10.00 वा. चे दरम्यान, **गुण नियंत्रण उपविभागीय कार्यालय पाटबंधारे वसाहत चैतन्यनगर नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे गुण नियंत्रण उपविभागीय कार्यालय पाटबंधारे वसाहत चैतन्यनर मुख्या कार्यालयाचे दरवाजाचे कुलूप कोणीतरी अज्ञात चोरटयाने तोडुन आत प्रवेश करून आतील पितळी धातुचे चाळण्याचे पाच संचातील 42 नग किंमती 8392/–रूपयाचा माल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी मोहम्मद तारेख नदीम, वय 47 वर्षे, व्यवसाय सहा. अभियंता श्रेणी 1 नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 264/2022 कलम 454, 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोना/206 मैलवाड, मो.क्र. 8888802387** हे करीत आहेत.

## 3)टेम्पो चोरी :–

**विमानतळ** :– दिनांक 31.07.2022 रोजी चे 22.00 ते दि. 01.08.2022 चे 07.00 वा. चे दरम्यान, **नुरी चौक ते माळटेकडी जाणारे रोडचे बाजुला काका कुशन जवळ नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे दोन टेम्पो 407 क्रमांक एमएच–14/डीएम–7022 किंमती 3,00,000/–रूपयाचा दुसरा टेम्पो क्रमांक एमएच–22/एए–3891 किंमती 5,00,000/–रूपयाचा असे एकुण दोन टेम्पो किंमती 8,00,000/–रूपयाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी महम्मद अकबर महम्मद अलताफ, वय 23 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. नुरी चौक नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 265/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री जाधव, मो.क्रं. 8007580146** हे करीत आहेत.

## 4)चोरी :–

**1)तामसा** :– दिनांक 01.08.2022 रोजी 12.30 वा. चे सुमारास, **लोहा पाटी पटेल यांचे शेतात ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने वाटयाने केलेल्या शेतातील बोरवेलचा 80 फुट विद्युत केबल किंमती 4000/–रूपयाचा चोरून नेत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी संजय भारत भिसे, वय 28 वर्षे, रा. गवतवाडी ह. मु. लोहा पाटी ता. हदगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे तामसा** गुरन 78/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1646 सुर्यवंशी, मो.क्रं. 9923451146** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :–

**1)किनवट** :– सन 2021 ते दि. 09.01.2022 चे दरम्यान, **शिवाजीनगर दराटी ता. उमरखेड जि. यवतमाळ ह. मु. धानोरा ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस बाईस घर बांधकामासाठी दीड लाख रूपये घेवुन ये म्हणुन शारिरीक व माणसीक छळ केला. तसेच तुला मुलीच होतात मुलगा होत नाही असे म्हणुन गळा दाबुन जिवे मारण्याची धमकी दिली. पहिली पत्नी जिवंत असतांना दुसरे लग्न केले. वगैरे **फिर्यादी** 35 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 152/2022 कलम 498(अ), 494, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1805 पांढरे, मो.क्रं. 7745001805** हे करीत आहेत.

## 6)भारतीय हत्यार कायदा :–

**वजिराबाद** :– दिनांक 01.08.2022 रोजी चे 13.36 वा. चे सुमारास, **हॉडीक्राफ्ट दुकान नं 6 लंगरसाब परिसर गुरूद्वारा नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने त्याचे ताब्यात विनापरवाना बेकायदेशीर रित्या आपल्या दुकानात तेरा तलवारी व आठ खंजर किंमती 24,000/–रूपयाचा माल ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/1098, गजानन दिगांबर किडे, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 265/2022 कलम 4/25, 7 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री निलपत्रेवार, मो.क्र. 9923922533** हे करीत आहेत.

## 7)जुगार :–

**लोहा** :– दिनांक 01.08.2022 रोजी चे 19.00 वा. चे सुमारास, **गवळी गल्ली रामसिंग ठाकुर यांचे घरासमोरील रोडवर ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 5870/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/1399 दत्तात्रय बापुराव शेळके, ने. पोस्टे लोहा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 152/2022 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/408 केंद्रे, मो.क्र. 9730726378** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबीशन :–

**1)बारड** :– दिनांक 31.07.2022 रोजी चे 23.30 वा. चे सुमारास, **बारड बसस्थानक समोरील नांदेड ते भोकर रोडवर मौ. बारड ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्रा एकुण किंमती 13,580/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने टाटा इंडीका कंपणीची कार क्रं एमएच–26/व्ही–403 किंमती 80,000/–रूपयाची असा एकुण 93,580/–रूपयाचे माला सह वाहतुक करीत असतांना ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/611, चक्रधर शिवाजी पवार, ने. पोस्टे बारड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बारड** गुरनं 58/2022 कलम 65 (ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/611 पवार, मो.क्र. 9892798021** हे करीत आहेत.

## 9)विद्युत शॉक लागुन मृत्यु :–

**1)कंधार** :–दिनांक 01.08.2022 रोजी 10.00 वा. चे सुमारास, **फुलाजी भाऊराव श्रीरामे यांच्या शेतात रूई ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे प्रभाकर मार्तंड श्रीरामे, वय 60 वर्षे, रा. रूई ता. कंधार जि. नांदेड,** हीस विद्युत तारेचा शॉक लागुन मरण पावला. वगैरे **खबर देणार लक्ष्मीबाई प्रभाकर श्रीरामे, वय 55 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. रूई ता. कंधार जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे कंधार** आ. मृ. **33/2022** कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री इंद्राळे, मो.नं. 9975754256** हे करीत आहेत.

## 10)विषारी औषध पिवून आत्महत्या :–

**कुंटूर** :–दिनांक 27.07.2022 रोजी चे 05.00 ते 08.00 दरम्यान, **मौ. कोकलेगाव कामाजी नारे यांचे शेतात कुंटूर ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे दत्ता पी. व्यंकट नारे, वय 23 वर्षे, रा. कोकलेगाव ता. नायगाव जि. नांदेड,** हा शेतीचे कर्जास कंटाळुन कोणतेतरी विषारी औषध पिवून आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार शिवानंद व्यंकट नारे, वय 19 वर्षे, व्यवसाय शती रा. कोकलेगाव ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे कुंटूर** आ. मृ. **22/2022** कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1952 निकम, मो.नं. 8080840778** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड